# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

## ४१२-ई, शिवाजीनगर, पुणे- ४११ ०१६.

फॅक्स २५६५६२३४ Email : ropune@dtemaharashtra.gov.in Web Site : - www.ropune.org.in

---

जा.क्र.तंशिविकापु/विवि/शिष्यवृत्ती/२०१९/ 3043
दिनांक : 23 JUL 2019

प्रति,
संचालक / प्राचार्य,
व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या सर्व संस्था,
पुणे विभाग.

**विषय :- राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेसाठी विभागनिहाय नोडल अधिकारी यांच्या नियुक्तीबाबत**

संदर्भ :- १. शासन पत्र, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक : संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२३७/तांशि-४, दि.२०.०६.२०१८.
२. तंत्रशिक्षण संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक : २ अ /एडीएम/२०१८/७९९, दि. २०.०६.२०१८
३. तंत्रशिक्षण संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक : २अ/एडीएम/२०१८/८६०, दि. ११.०७.२०१८.
४. या कार्यालयाचे परिपत्रक जा.क.तंशिविकापु/विवि/२०१९/३०४१, दि. २३.०७.२०१९

तंत्रशिक्षण संचालनालयाच्या संदर्भाधिन पत्र क्र. २ नुसार व शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक : संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दि. ०७.१०.२०१७ अन्वये, राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजने अंतर्गत आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांना लाभाची व्याप्ती वाढविणे व नवीन अभ्यासक्रमांचा समावेश करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. उपरोक्त शासन निर्णयातील तरतूदीनुसार शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० मध्ये विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणा-या राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजने अंतर्गत आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शिक्षण शुल्काच्या ५० टक्के इतकी रक्कम आपण विद्यार्थ्यांकडून घ्यावी. यापेक्षा जासत शिक्षण शुल्क विद्यर्थ्यांकडून घेऊ नये. प्रवेशाच्या वेळी राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क व शिष्यवृत्ती योजनेसाठी पात्र विद्यार्थ्यांकडून विहीत शिक्षण शुल्काच्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त शुल्क घेतल्याचे निदर्शनास आल्यास अशा संस्थांवर नियमानुसार तात्काळ कारवाई करण्यात येईल.

उपरोक्त तरतूदीची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी, तंत्रशिक्षण संचालनालयातर्फे नोडल अधिका-यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. पुणे विभागासाठी श्री. सी. टी. कुंजीर, सहाय्यक संचालक (तांत्रिक), तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय पुणे मोबाईल क्रमांक ९०११०००६०६ यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आलेली आहे. श्री. सी. टी. कुंजीर, सहाय्यक संचालक (तांत्रिक), तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय पुणे हे आकस्मिकरित्या आपल्या संस्थेस भेट देवून, प्रवेशाच्यावेळी आकारण्यात आलेल्या शुल्काबाबत पडताळणी करतील. तसेच Intitute Level Seats / Against CAP Seats जागा भरण्याबाबत संदर्भ क्रमांक ४ नुसार तपासणी करतील व विद्यार्थ्यांची पिळवणूक होत नसल्याबाबत खात्री करतील

श्री. सी. टी. कुंजीर, सहाय्यक संचालक (तांत्रिक), तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय पुणे यांना याबाबत आवश्यक ते सहकार्य करावे. तसेच या पत्राची व यासोबत जोडलेल्या तंत्र शिक्षण संचालनालयाच्या पत्राची प्रत आपण आपल्या संस्थेच्या सूचना फलकावर दर्शनी भागात दिसेल अशा ठिकाणी प्रदर्शित करावी.

(चं.तु.कुंजीर)
प्र. सहसंचालक
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी - 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102

E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक/महत्वाचे

क्रमांक : ३अ/एडीएम/२०१८/८६०

दिनांक : ११.७.२०१८

विषय :- राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना योजनेसाठी विभागनिहाय नोडल अधिकारी नियुक्त करणेबाबत...

संदर्भ : १ शासन पत्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण -२०१८/प्र.क्र.२३७/तांशि-४ दिनांक २०.६.२०१८

२ संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक ३अ/एडीएम/२०१८/७११, दि.२०.६.२०१८

संचालनालयाच्या संदर्भाधीन परिपत्रकान्वये शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण -२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दिनांक ७.१०.२०१७ अन्वये राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यांना लाभाची व्याप्ती वाढविणे व नवीन अभ्यासक्रमांचा समावेश करण्याबाबत आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. या शासन निर्णयातील तरतूदीनुसार शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्यावेळी शुल्क नियामक प्राधिकरणाने निश्चित केलेल्या शिक्षण शुल्काच्या केवळ ५० टक्के इतकी रक्कम शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थ्यांकडून घ्यावी, यापेक्षा जास्त शुल्क विद्यार्थ्यांकडून घेण्यात येऊ नये. प्रवेशाच्या वेळी विद्यार्थ्यांकडून विहीत शिक्षण शुल्काच्या ५० टक्केपेक्षा जास्त शुल्क घेतल्याचे निदर्शनास आल्यास अशा संस्थाविरुध्द नियमानुसार कारवाई तात्काळ करण्यात येईल असे कळविण्यात आलेले आहे.

उपरोक्त तरतूदींची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यासाठी विभागनिहाय नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात येत आहे, त्यांची माहिती खालीलप्रमाणे :

| अ.क्र. | विभाग | नोडल अधिकारी | कार्यालयाचे नाव व पत्ता | संपर्कासाठी मोबाईल क्रमांक |
|---|---|---|---|---|
| १ | मुंबई | श्री जी आर निखाडे, सहा.संचालक(तां) | सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय मुंबई | ९८२१२८६५०८ |
| २ | पुणे | श्री सी टी कुंजीर, सहा.संचालक(तां) | सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे | ~~[illegible]~~ / ७०११ ००८ ८०६ |
| ३ | नाशिक | श्री एस पी पगारे, सहा.संचालक(तां) | सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय नाशिक | ९४०४५९३१५८ |
| ४ | औरंगाबाद | श्री जी आर सवाई, विभागप्रमुख स्थापत्य अभि. | सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद | ९८९०१८५०७० |
| ५ | अमरावती | श्री एम ए अली, सहा.संचालक (तां) | सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय अमरावती | ९८२२३७८७३७ |
| ६ | नागपूर | डॉ. एस आर कुक्कडपवार, सहा.संचालक (तां) | सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय नागपूर | ९८८१०००८०४ |

वरील नोडल अधिकारी यांनी त्यांच्या विभागात येणाऱ्या व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालय/तंत्रनिकेतन यांनी सदर योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांस अनुज्ञेय असणाऱ्या शिक्षण शुल्क शिष्यवृत्तीची रक्कम ही संबंधित विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्यावेळी आगाऊ स्वरूपात घेऊ नये व विद्यार्थ्यांची पिळवणूक होणार नाही याची योग्य ती खात्री करण्यासाठी वेळोवेळी संस्थांना भेट द्यावी. प्रवेशित विद्यार्थ्यांच्या तक्रारीबाबत त्यांचे स्तरावर चौकशी करून संबंधित संस्थेवर उचित कार्यवाही करून कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त शुल्क घेण्यात येत नाही याबाबत दक्षता घ्यावी. तसेच यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल संचालनालयास विभागीय कार्यालयामार्फत सादर करावा.

(डॉ. अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत माहितीस्तव अग्रेषित :
१. मा. सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२
२. मा. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई
३. मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत : माहितीस्तव आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
१. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर त्यांना कळविण्यात येते की, वरील आदेशाच्या प्रती आपल्या विभागाच्या अधिनस्त सर्व तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना त्यांच्या सूचनाफलकावर दर्शनी भागात दिसेल अशा ठिकाणी प्रदर्शित करण्याबाबत कळविण्यात यावे.
२. कार्यासन क्रमांक १८, मुख्य कार्यालय, मुंबई

# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

४१२ई, के.एम. मुन्शी मार्ग, बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे – ४११ ०१६

☏(020)25656234, FAX : (020)25656234

ईमेल : ropune@dtemaharashtra.gov.in संकेतस्थळ : www.ropune.org.in


जा.क्र.तंशिविकापु/विवी/प्रवेश २०१९ - २० / 3041 दिनांक :- 23 JUL 2019

**महत्वाचे/तातडीचे**

प्रति,
प्राचार्य/संचालक,
व्यावसायिक पदवी अभ्यासक्रमाच्या सर्व विनाअनुदानित संस्था,
पुणे विभाग.

विषय :- संस्थास्तर व अगेन्स्ट कॅप प्रवेश हे प्रवेश नियम पुस्तिका २०१९-२० मधील नियम क्र.१३,१४,१५ नुसार करणेबाबत

संस्थास्तरीय कोट्यातील जागा,अल्पसंख्यांक कोट्यातील जागा आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांवर प्रवेश- विनाअनुदानित संस्थेचे संचालक किंवा प्राचार्य, या जागांवरील प्रवेश प्रक्रिया खालील पद्धतीचा वापर करून पार पडतील -

क) उपलब्ध जागांवर प्रवेश हे पारदर्शक रीतीने व ज्यांनी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेसाठी व नंतर संस्थेकडे प्रवेशासाठी आवेदनपत्र सादर केलेले आहे अशा सर्व उमेदवारांच्या परस्पर गुणवत्तेनुसार करण्यात येतील

ख) प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यापूर्वी पुरेसा वेळ मिळेल अशा रीतीने संस्थेची माहिती व प्रवेशाचे नियम विनिर्दिष्ट केलेले असतील अशी पुस्तिका किंवा निर्देशपुस्तिका प्रकाशित करण्यात यावी.माहिती पुस्तिकेतील सर्व माहिती संस्थेच्या संकेत स्थळावर देखील प्रदर्शित करण्यात यावी

ग) प्रत्येक संस्था प्रवेशाचे वेळापत्रक आणि संस्थेकडून प्रत्येक पाठ्यक्रमातील भरावयाच्या एकूण जागांची संख्या यांची जाहिरात संस्थेच्या संकेतस्थळावर अधिसूचित करेल. व आवेदनपत्र मागवेल.प्रवेशासाठी वेळोवेळी शासनाने अधिसूचित केलेले व समुचित प्राधिकाऱ्याने विनिर्दिष्ट केलेले पात्रतेचे निकष पूर्ण करणारे इच्छुक उमेदवार हे संस्थेचे संचालक किंवा प्राचार्य याच्याकडे संस्थास्तरावरील प्रवेशासाठी नियम ३(४)ख मध्ये तरतूद केल्यानुसार पात्र इच्छुक उमेदवार प्रथम सक्षम प्राधीकरणाकडे कागदपत्रांची तपासणी करण्यासाठी परस्पर गुणवत्तेच्या आधारे प्रवेश देणे संस्थांना शक्य व्हावे म्हणून आवेदनपत्र सादर करतील.व या जागा ते प्रथम वर्षाकरिता महाराष्ट्र-कर्नाटक वादग्रस्त सीमा भागातील मराठी भाषक उमेदवार,अखिल भारतीय उमेदवारी असणारे उमेदवार,अल्पसंख्यांक उमेदवारी,अनिवासी भारतीय उमेदवारी,विदेशी विद्यार्थी किंवा भारताचे समुद्रापार किंवा भारतीय वंशाची व्यक्ती असलेले उमेदवार,

आखाती देशातील भारतीय कामगारांची मुले या अधिसंख्य कोट्यातून प्रवेश घावयाच्या उमेदवारांची गुणवत्ता यादी /याद्या संस्थेच्या सूचनाफलकावर व संकेतस्थळावरसुद्धा प्रसिद्ध करतील.विनिर्दिष्ट केलेल्या पाठ्यक्रमांच्या संस्थास्तरीय कोट्यातील जागा केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेला परत करण्याचा उद्देश्य असणा-या अल्पसंख्यांक किंवा अल्पसंख्यांकेतर,केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या प्रत्येक फेरीतील जागेची रचना प्रदर्शित करण्यापुर्वी दोन दिवस अगोदर तसे कळवतील.आणि त्या जागांचे केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या नियमानुसार वाटप करण्यात येईल. घेतलेल्या आणि रद्द केलेल्या सर्व प्रवेशाबाबतची माहिती संगणकीय (ऑन लाईन )प्रणालीमार्फत तात्काळ संस्था अद्ययावत करील. जर केंद्रीभूत प्रवेश फे-या पार पडल्यानंतर केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या जागा रिक्त राहिल्यास किंवा रद्द झाल्यास ती जागा केंद्रीय प्रवेश प्रक्रियेदरम्यान ज्या प्रवर्गाकरिता राखून ठेवलेली होती ,त्या प्रवर्गाच्या उमेदवारामधूनच भरण्यात येईल.तदनंतरही जागा रिक्त राहिल्यास ,त्या जागा अर्जदारच्या परस्पर गुणवत्तेच्या आधारे भरण्यात येतील.

**गुणवत्ता यादी व प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांच्या यादीस मान्यता –**

प्रवेश प्रक्रिया संपल्यानंतर प्रत्येक विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्था ,संचालक तंत्र शिक्षण व प्रवेश नियंत्रण प्राधिकरण यांचेकडे प्रवेश मान्यतेकडे प्रस्ताव सादर करतील. सदर प्रवेश मान्यतेच्या प्रस्तावामध्ये संस्थास्तरावर प्रवेश देण्यात आलेल्या व कोटा असलेल्या सर्व विद्यार्थ्यांची यादी, उमेदवारीचा प्रकार ,आरक्षण,अर्हता इत्यादी तसेच संस्थास्तरावर प्रवेश दिलेल्या उमेदवारांच्या प्रवेशासाठीच्या आवश्यक कागदपत्रांचा समावेश असेल. जर एखाद्या अल्पसंख्यांक शैक्षणिक संस्थेने लागोपाठच्या तीन वर्षाच्या कालावधीत तिच्या मंजूर क्षमतेच्या किमान एक्कावन्न टक्के प्रवेश संबंधित अल्पसंख्यांक प्रवर्गातील व्यक्तीमधून देण्यात कसूर केली तर,सक्षम अधिकारी ,त्याबाबतची माहिती विभागास कळवतील.विभागाकडून अशा संस्थांबाबतची माहिती निरीक्षण अल्पसंख्यांक विकास विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित करतील.

**संस्थेद्वारे प्रवेश रद्द केल्यानंतर शुल्काचा परतावा -**

उमेदवार प्रवेश रद्द करण्यासाठी ऑन लाईन पद्धतीद्वारे अर्ज करील आणि प्रवेश रद्द करण्यासठी असलेल्या प्रणाली निर्मित अर्जाची स्वाक्षरीत प्रत संस्थेला सादर करील.उमेदवाराकडून प्रवेश रद्द करण्याबाबत स्वाक्षरीत लेखी विनंती अर्ज सक्षम अधिकारी यांनी दिलेल्या वेळापत्रकानुसार प्राप्त झाल्यानंतर, संस्था तात्काळ ऑन लाईन पद्धतीने प्रवेश रद्द करील आणि संस्थेच्या लॉगइन मधून प्रवेश रद्द केल्याबाबत संगणकीय (ऑन लाईन ) पोच तयार करील आणि उमेदवाराला स्वाक्षरीत प्रत देईल.जर उमेदवाराने प्रवेशाच्या अंतिम दिनांकास ( कट ऑफ दिनांकास ) किंवा त्यापूर्वी प्रवेश रद्द केल्यास ,शुकाचा परतावा, म्हणजेच एकूण शुल्कामधून रुपये १००० एवढे प्रक्रिया शुल्क वजा करून किंवा समुचित प्राधिकरणाने किंवा शासनाने वेळोवेळी निर्धारित केल्यानुसार देण्यात येईल.जर सक्षम प्राधिक-याने घोषित केलेल्या प्रवेशाच्या अंतिम दिनांकाच्या नंतर प्रवेश रद्द केला असेल तर ,प्रतिभूती ठेव आणि तारण धन ठेव वगळता कोणताही परतावा मिळण्यास उमेदवार पात्र असणार नाही.

कोणतीही संस्था, ज्यांच्याकडे उमेदवारांनी त्यांची प्रमाणपत्रे ,पदविका/पदवी ,व इतर कागदपत्रे त्या संस्थेमध्ये प्रवेशासाठी जमा केलेली असतील ,व जर उमेदवार अशा संस्थेमध्ये अभ्यासक्रम पुढे चालू ठेवण्यासठी किंवा त्या संस्थेतील सुविधा घेण्यासाठी इच्छुक नसतील अशा प्रसंगी जमा

करण्यात आलेली प्रमाणपत्रे,पदवी/पदविका व इतर कागदपत्रे उमेदवारास परत करण्यास कोणत्याही प्रकारे विरोध करणार नाहीत किंवा त्यासाठी अशा अभ्यासक्रमाचे किंवा इतर कोणतेही शुल्क अदा करण्यासाठी त्याच्यावर दबाव टाकणार नाहीत.

23/7/2019

( प्रा.सी.टी.कुंजीर )

प्र. सहसंचालक

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,पुणे